# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

तार — EDUTECH E-mail : desk16@dte.org.in Internet :http/www.dte.org


क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१२/१३३

दिनांक : 1 1 अक्तूबर OCT 2012

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

विषय :- विभागाचे संकेतस्थळ अद्ययावत ठेवणेबाबत

संदर्भ :- उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०१२/आस्था-१, दिनांक ६/९/२०१२

उपरोक्त विषयाबाबतचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०१२/आस्था-१, दिनांक ६/९/२०१२ चे पत्र सहपत्रासह सोबत जोडत आहे.

सदर प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, विभागाच्या संकेतस्थळावर विभागाशी संबंधित माहिती उपलब्ध करून देणें आवश्यक आहे. याकरिता आपल्या विभागातील कार्यासनांमध्ये राबविण्यात येणा-या विविध योजना, पुरस्कार, शिष्यवृत्ती इ. बाबतची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून देऊन विभागाचे संकेतस्थळ अद्ययावत ठेवण्याबाबतचे निर्देश आपल्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यांना देण्यात याव्यात.

सहसंचालक तंत्र शिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, अमरावती
५३२६ दिनांक १९/१०/२०१२

( दयानंद मेश्राम )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

प्रत : कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

---

महत्वाचे

सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती
क्र.विकाअ/शिक्षण/संकेतस्थळ/२०१२/ २८६५
दिनांक :- ०१/११/२०१२

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय / अनुदानित / विद्यापिठ व्यवस्थापित / विनाअनुदानित,
अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तूशास्त्र / एमबीए / एमसीए
पदविका/पदवी / पदव्युत्तर पदवी संस्था.

त्यांना कळविण्यात येते की उपरोक्त पत्रात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती

प्रतिलिपी : प्रक्रिया योजक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळी टाकण्याकरीता.

-७५०१९५/कांशवी
, ९७७५

१५५७
१०/०९

(१)

महाराष्ट्र शासन

<u>अतितात्काळ</u>

क्र.-संकीर्ण-२०१२/आस्था-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक- ६ सप्टेंबर २०१२

प्रति,
सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई
संचालक, कला संचालनालय, मुंबई.
संचालक, ग्रंथालय संचालनालय, मुंबई.

विषय:- विभागाचे संकेतस्थळ अद्ययावत ठेवणेबाबत-

संदर्भ:- माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे पत्र क्र. मातंस-२०१२/२९, दि.२१/८/१२

उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्र सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

विभागाच्या संकेतस्थळावर विभागाशी संबंधित माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. याकरीता विभागातील कार्यासनांमध्ये राबविण्यात येणा-या विविध योजना, पुरस्कार, शिष्यवृत्ती इ. बाबतची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याकरता आस्था-१, कार्यासनास त्वरीत उपलब्ध करुन द्यावी व यास प्राथम्य द्यावे.

तसेच सर्व संचालनालयांनी त्यांच्या कार्यालयातील व अधिपत्याखालील शासकीय कार्यालयांतील अधिका-यांची नावे, पदनामे, कार्यालयांचे पत्ते, दूरध्वनी क्रमांक, इ. बाबी त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्याव्यात तसेच संचालनालयांशी संबंधीत विविध योजना, इ. ची माहिती व माहितीच्या अधिकारान्वये माहिती मिळविण्याकरता नियुक्त जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या नावांची यादीही संकेतस्थळावर तात्काळ टाकावी. या संदर्भात करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती या विभागास तात्काळ सादर करावी. याबाबत माहिती तंत्र संचालनालयातर्फे पाठपुरावा केला जात असल्यामुळे प्राथम्याने कार्यवाही करणे अपेक्षित आहे

उर्मिला जोशी
(उर्मिला जोशी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,
श्री. कि.अ.जाधव, कक्ष अधिकारी (वेब-कोऑर्डीनेटर)
यांनी विभागाची व सर्व संचालनालयांची माहिती विभागाच्या संकेतस्थळावर देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

कांशि-१

<u>सर्व कार्यासने</u>
त्वरीत कार्यवाही करावी-

१०/९